उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कामठी, जि.नागपूर येथील ११ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०२१/प्र.क्र.११८/आरोग्य-३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

दिनांक : १६ जून,२०२१

वाचा -

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक - पदनि २०१८/प्र.क्र.१८५/आरोग्य -४, दिनांक- ०६.०६.२०१९**

२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक - पदनि २०२०/प्र.क्र.२६/आरोग्य -३, दिनांक- २८.०१.२०२०**

३) **आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-१२/उपजिरु,कामठी,जि.नागपूर/अपदे/सन १९-२०/१५०८९-९०/१९, दिनांक- १४.०१.२०२०.**

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय कामठी, जि.नागपूर हे १०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धीत करण्यात आल्याने अतिरिक्त ४७ पदांची पदनिर्मिती करण्यात आली आहे. त्यातील ११ पदे अस्थायी स्वरुपाची नियमित पदे आहेत. त्यामुळे तेथील नवनिर्मित ११ अस्थायी पदांना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने अनुक्रमांक २ अन्वये दि.०६.०६.२०१९ ते दि. २९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ संपुष्टात आली आहे.

२. आता या शासन निर्णयान्वये वर नमूद १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालय कामठी, जि.नागपुर येथील सदर ११ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२० ते दि. ३१.०८.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत

आहे. सदर मुदतवाढ दिल्यानंतर पुढील प्रस्ताव एकत्रित अस्थायी पदांचा मुदतवाढीकरीता सादर करण्यात यावा.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
००१ - संचालन व प्रशासन
(०१)(०९) - महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामिण/कुटीर रुग्णालयांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन (२२०१ ४६२४)

४. हा शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दिनांक. १२.०२.२०२०, दिनांक ३१.०८.२०२० व दिनांक १५.०२.२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०६०७१४५२४६६६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, cn=Roshani Dinesh Kadam Patil
Date: 2021.06.16 17:27:24 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.

६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, नागपुर
८. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपुर.
९. वैद्यकीय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, कामठी, जि.नागपुर
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३)

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पदआ-२०२१/प्र.क्र.११८/आरोग्य-३,
दिनांक- १६ जून, २०२१ सोबतचे विवरणपत्र.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	ग्रेड पे	अस्थायी पदे
१	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ), गट -अ	एस-२०	५६१००-१७७५०००	१
२	वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग तज्ञ), गट -अ	एस-२०	१७७५०००-५६१००	१
३	वैद्यकीय अधिकारी(नेत्रशल्यचिकिस्तक),गट-अ	एस-२०	१७७५०००-५६१००	१
४	वैद्यकीय अधिकारी (अपघात कक्ष), गट -अ	एस-२०	१७७५०००-५६१००	२
५	वैद्यकीय अधिकारी, गट -ब	एस-१५	४१८००-१३२३००	१
६	परिसेविका	एस-१४	३८६००-१२२८००	३
७	प्रशासकिय अधिकारी, गट- ब	एस-१५	४१८००-१३२३००	१
८	कार्यायलीन अधिक्षक,गट- क	एस-१४	३८६००-१२२८००	१
			एकूण	**११**